## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६ चे कलम ७७ (अ)(ब) तसेच ७३ आय अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/एल विभाग/७७ (अे)(ब)/७३ आय/सन-२०१७. २२०४
उपनिबंधक, सहकारी संथा, एल विभाग, मुंबई, रुम नं.३११
३ रा मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापुर,
नवी मुंबई ४०० ६१४. दिनांक :-१४/११/२०१७.

वाचावे :- १. मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे कडील जा.क्र. ४६०५/२०१७ दि.११.०८.२०१७.
२.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(ब) व ७३(आय) अन्वये तरतुद
३.प्राधिकृत अधिकारी यांच्या कडील दि.०६.११.२०१७ रोजीचा अहवाल.

ज्याअर्थी, **अमर अपार्टमेंट को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, अपो कमानी, एल बी एस मार्ग, कुर्ला (प) मुंबई ४०० ०७०.** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६ व त्या खालील नियमान्वये नोंदविण्यांत आलेली असुन ती, या कार्यालयाचे कार्यकक्षेत येत आहे. आणि,

ज्याअर्थी, सदर संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम त्या मधील अधिनियम व उपविधीतील तरतुदीनुसार नोंदणीकृत करण्यांत आलेली सहकारी गृहनिर्माण संस्था असुन या कार्यालयाने दिलेले आदेश व निर्देशांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे, यांच्या कडील वरील संदर्भीय क्रमांक (१) रोजीच्या आदेशान्वये आपल्या संस्थेची निवडणुक घेण्यासाठी प्राधिकृत अधिकारी श्री.एस. एस.वाघमारे, मुख्य लिपीक यांची नियुक्ती करण्यांत आलेली होती आणि,

ज्याअर्थी प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयास वरील संदर्भ क्र.३ अन्वये दाखल केलेला आहे. सदर अहवालात प्राधिकृत अधिकारी यांनी दि.१४.०८.२०१७ व दि.२६.१०.२०१७ रोजी निवडणुक कामी निवडणुक नियमावली नुसार आवश्यक असलेली माहिती सादर करणे बाबत कळविलेले असुनही आपण त्यांचेशी संपर्क साधलेला नाही. तसेच प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या पदाधिका-यांशी भ्रमणध्वनी वरुनही संपर्क साधलेला असुनही त्यांना समाधानकारक उत्तर प्राप्त झालेले नाही. व संस्था निवडणुक कामकाज पार पाडणेकरीता कोणतेही सहकार्य करीत नाही असे नमुद केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय मध्ये मुदत संपण्यापुर्वी निवडणुका घेण्या बाबत कळविण्याची आणि तिच्या व्यवस्थेसाठी सहाय्य करण्याची समितीची किंवा प्रशासकाची किंवा प्राधिकृत अधिका-याची जबाबदारी :-

(१) समितीची मुदत संपण्यापुर्वी, कलम ७३ कब च्या पोटकलम (१४) अन्वये तरतुद केल्याप्रमाणे, तिची निवडणुक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाला तिची मुदत संपण्याच्या किमान सहा महिन्यापुर्वी कळविणे हे समितीचे कर्तव्य असेल.

(२) समितीने तिची निवडणुक घेण्या संबंधात, पोट कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाला कळविण्यास बुध्दीपुरस्पर कसुर केली असेल, तर आणि त्यामुळे कोणत्याही

Scanned by CamScanner

कारणास्तव मुदत संपण्यापुर्वी समितीची निवडणुक घेता आली नसेल तर समितीचे सदस्य त्यां अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील आणि अशा परिस्थितीत निबंधक अधिनियमांच्या कलम ७७ (अ) अन्वये योजिल्याप्रमाणे कारवाई करील. असे नमुद केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त संस्थेच्या समिती सदस्यांची मुदत संपुष्टात आलेली असल्यामुळे व संस्थेच्या पदाधिका-यानी निवडणुक कामी योग्य ती उपाययोजना व सहकार्य करण्यास कसुर केलेली असल्यामुळे आजमिती संस्थेवर कोणतीही कायदेशिररित्या गठित समिती कार्यरत नाही. त्यामुळे संस्थेचा दैनंदिन कारभार बंद पडलेला असु यासाठी नवनिर्वाचित समितीचे गठन होणे आवश्यक आहे. आणि,

त्याअर्थी, संस्थेमध्ये कोणतीही कायदेशिर रित्या गठित झालेली समिती कार्यरत नसल्यामुळे महाराष्ट्र सहका संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) नुसार संथेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाल्यामुळे संस्थेचे दैनंदि काम करण्यासाठी त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच निवडणुकीची प्रक्रिया पार पाडणेसाठी संस्थे विद्यमान व्यवस्थापक समिती बखास्त करण्यांत येत असुन संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी संस्थेवर त्वरी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे बाबतची कारवाई करणे साठी नोटीस प्रसिध्द करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नसल्या मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी शिरीष सपकाळ, उपनिबंधक, सहकारी संस्था एल विभाग, मुंबई **अमर अपार्टमेंट को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसाय लि, अपो कमानी, एल बी एस मार्ग, कुर्ला (प) मुंबई ४०० ०७०.** या संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी श्री.अ जी. जाधव, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

सदरचा आदेश आज दि.१४/११/२०१७रोजी माझे सही व या कार्यालयाचे मुद्रेसह दिला असे.

**(शिरीष सपकाळ)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई.**

**प्रत :-**

**१.अध्यक्ष/सचिव, अमर अपार्टमेंट को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, अपो कमानी, एल बी एस मार्ग, कुर्ला (प) मुंबई ४०० ०७०.**

**२.श्री.अे.जी. जाधव, (प्राधिकृत अधिकारी)** 16/11/17

यांनी त्वरीत संस्थेच्य दप्तराचा ताबा स्विकारुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच स कालावधीत प्राधिकृत अधिका-याने दैनंदिन कामकाजाव्यतिरीक्त इतर सर्व कामकाजाबाबत निर्णय हे केवळ संस्थे अधिमंडळाच्या सर्वसाधारण सभेमध्येच घ्यावेत.

**३. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित/ मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित________ शाखा.**

**४. इतर बँक __________________ शाखा.**

**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई.**

Scanned by CamScanner